दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य सपादक सागर राणा अभोरे सपादक बडूभाऊ इंगोले
RNI No - MHMUL/25/A0788
वाशीम ■ गुरुवार दि. ३० ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष : २ रे ■ अंक : 176 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रूपये ■ Title code:- MAHMUL039353

## मुंबई पालिकेची निवडणूक जानेवारीच होणार?

### आरक्षण सोडत ११ नोव्हेंबरला, आयोगाकडून सूचना प्रसिद्ध

मुंबई : मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या तयारीला वेग आला असून राज्य निवडणूक आयोगाने आरक्षण निश्चिती व सोडत कार्यक्रमाचे सविस्तर वेळापत्रक बुधवारी जाहीर केले आहे. महापालिकेची ११ नोव्हेंबरला आरक्षण सोडत काढली जाणार आहे. आयोगाने महानगरपालिकेला आरक्षण प्रक्रियेचे टप्पे निश्चित करून ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सर्व कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पार पाडणे बंधनकारक आहे.

**निवडणूक जानेवारीपूर्वी?**

राज्य निवडणूक आयोगाने सोडतीची प्रक्रिया पारदर्शक आणि लोकाभिमुख ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. शिवाय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार ही संपूर्ण प्रक्रिया निश्चित वेळापत्रकानुसार पूर्ण करणे बंधनकारक आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेची निवडणूक जानेवारी २०२६ पूर्वी होईल, हे आता स्पष्ट झाले आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या या आदेशानंतर मुंबईतील राजकीय पक्ष, इच्छुक उमेदवार आणि मुंबईकरांमध्ये निवडणूक प्रक्रियेबाबत अर्थातच उत्सुकता निर्माण झाली आहे.

**सोडतीचा कार्यक्रम...**

१) प्रारूप आरक्षणास मान्यता घेणे व राज्य निवडणूक आयोगाकडे प्रस्ताव सादर करणे. कालावधी : ३० ऑक्टोबर २०२५ ते ३ नोव्हेंबर २०२५

२) आरक्षण सोडतीची जाहीर सूचना वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे : ६ नोव्हेंबर २०२५

३) आरक्षणाची सोडत काढणे : ११ नोव्हेंबर २०२५ सोडतीचा निकाल राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करणे.

४) प्रारूप आरक्षण, हरकती व सूचना मागविणे (जाहीर सूचना) : १४ नोव्हेंबर २०२५

५) हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक : २० नोव्हेंबर २०२५

६) प्राप्त हरकती / सूचनांवर आयुक्तांचा निर्णय : २१ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर

७) अंतिम आरक्षण शासन राजपत्रात प्रसिद्ध करणे : २८ नोव्हेंबर २०२५

**प्रवर्गनिहाय जागा**

**एकूण जागा : २२७**
**अनुसूचित जाती : १५**
**अनुसूचित जमाती : २**
**इतर मागासवर्गीय : ६१**
**महिला : ११४ (५० टक्के आरक्षण)**

## मोंथाचा विध्वंस! 2.14 लाख एकर पिकं उद्ध्वस्त

### १८ लाख लोकांना फटका, रेल्वे स्टेशन पाण्याखाली

आंध्र प्रदेशमध्ये मोंथा चक्रीवादळाचा कहर पाहायला मिळत आहे. तेलंगणामध्येही वादळामुळे मुसळधार पाऊस पडत आहे. आंध्र प्रदेश सरकारच्या अंदाजानुसार, मोंथामुळे १८ लाख लोकांना मोठा फटका बसला आहे, चक्रीवादळ ताशी १०० किमी वेगाने राज्यात धडकलं आणि २.१४ लाख एकरवरील पिकं उद्ध्वस्त झाली.

मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी दिलेल्या माहितीनुसार, मोंथामुळे राज्यात तीन जणांचा मृत्यू झाला. २,२९४ किलोमीटर रस्त्यांचं नुकसान झालं. प्रभावित जिल्ह्यांमधील १,२०९ मदत शिबिरांमध्ये १,१६,००० लोकांना आश्रय मिळाला. आंध्र प्रदेशात मोंथाच्या विनाशकारी प्रभावामुळे तेलंगणाच्या विविध भागात मुसळधार पाऊस पडला. आठ जिल्ह्यांमध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

आमच्या न्यूजलेटरसाठी साईन-अप करा

**मुसळधार पावसाचा कहर**



तेलंगणातील वारंगल, जनगाव, हनुमकोंडा, महाबूबाबाद, करीमनगर, सिद्दीपेट, यादाद्री भुवनागिरी, सूर्यपेट, नलगोंडा, खम्मम, भद्राद्री कोठागुडेम, नगरकुरनूल आणि पेद्दापल्ली या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडला. हैदराबादमध्येही मुसळधार पाऊस पडला. तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी चक्रीवादळ मोंथामुळे होणाऱ्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर राज्य प्रशासनाला हाय अलर्टवर राहण्याचे निर्देश दिले आहेत.

**रेल्वे स्टेशनवरील ट्रॅक पूर्णपणे पाण्याखाली**

मोंथामुळे झालेल्या मुसळधार पावसामुळे वारंगलमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली. वारंगल रेल्वे स्टेशनवरील ट्रॅक पूर्णपणे पाण्याखाली गेले, ज्यामुळे रेल्वे सेवा बंद करण्यात आली. तेलंगणामध्ये, महाबूबाबाद जिल्ह्यातील दोर्नाकल रेल्वे यार्डमध्ये पाणी भरल्याने अनेक ट्रेन रद्द करण्यात आल्या. आंध्र प्रदेशात मोंथा चक्रीवादळामुळे झालेल्या विध्वंसात अडकलेल्या अनेक लोकांसाठी ड्रोन देवदूत ठरला.

**ड्रोनचा वापर करून वाचवला जीव**

बापटला जिल्ह्यात शेख मुन्ना नावाचा एक व्यक्ती पुराच्या पाण्यात वाहून गेला आणि ड्रोनचा वापर करून त्याला वाचवण्यात आलं. पोलीस आणि प्रशासनाने ड्रोनचा वापर करून सखल भागात देखरेख केली आणि परिस्थिती बिघडण्यापूर्वी लोकांना सतर्क केले. एनडीआरएफचं मदत आणि बचाव कार्य वेगाने सुरू आहे. एनडीआरएफच्या २६ टीम तैनात करण्यात आल्या आहेत. ६६६ लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवलं आहे.

## महिला डॉक्टरवर अत्याचार करणाऱ्या पोलिसावर कठोर कारवाई करण्याची शेकापची मागणी



**पनवेल वार्ताहर**

महिला डॉक्टरवर पोलिसाकडून करण्यात आलेल्या अत्याचार प्रकरणाबाबत कठोर कारवाई करण्याची मागणी शेकाप महिला आघाडी पनवेल महानगरपालिका जिल्हाध्यक्ष हर्षला योगेश तांबोळी यांनी पोलीस उपायुक्त, परिमंडळ 3 यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

फलटण तालुक्यातील एका महिला डॉक्टरवर पोलिसाने अत्याचार केल्याची गंभीर घटना घडली. त्यामुळे पोलीस प्रशासन आणि शासन व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास डळमळीत झाला आहे. महिलांच्या सन्मान, सुरक्षितता आणि न्यायासाठी शासनाने अनेक योजना व कायदा लागू केले आहेत. मात्र जे अधिकारी कायदा अंमलबजावणीसाठी नेमलेले आहेत ते अशा प्रकारचे कृत्य करत असून कुंपणच शेत खात असेल तर न्याय कोणाकडे मागणार असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे. त्यामुळे अशा घटनेची तातडीने उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित पोलिसावर कठोर शिक्षा करण्यात यावी आणि पीडित महिला डॉक्टरला न्याय मिळावे जेणेकरून असे अमानुष प्रकार पुन्हा घडणार नाहीत असे निवेदनात म्हटले आहे.

## कोणताही दुजाभाव न करता बळीराजाला सरसकट मदत देण्याची मनसे ची मागणी.

### प्रांत व तहसील दारांना निवेदन सादर

**पेण**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने अवकाळी अतिवृष्टीमुळे ऐन रायगड जिल्ह्यातील तसेच पेण तालुक्यातील भातशेती कापणी अगोदरच जमीनदोस्त झाल्याने त्वरित सर्व शेतकऱ्यांच्या शेतजमिनींचे पंचनामे करुन विशेष हेक्टर मदत जाहीर करण्याबाबत पेण प्रांताधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

: गेल्या काही दिवसांत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात तसेच कोकणातील रायगड जिल्ह्यात देखील अवकाळी अतिवृष्टीमुळे बळीराजा हा हवालदिल झाला असून, तरी महाराष्ट्राचे मुख्य तांदळाचे स्त्रोत हे कोकणातून मिळत असताना,रायगड जिल्ह्यातील असंख्य तालुक्यातील तसेच आपल्या पेण तालुक्यातील देखील भातशेती कापणी अगोदरच जमीनदोस्त झाली आहे तर असंख्य ठिकाण तर भाताचे दाणे पडले असून तर उभ्या तयार भाताला पुन्हा



कोंब आल्याने बरेच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी कर्ज काढून शेती करीत भाताचे पीक उभे केले असताना अश्या नैसर्गिक अवकाळी पावसामुळे उत्पादन शून्य झाले आहे तरी सदर आलेली नैसर्गिक आपत्ती ही दुःखद असून आम्ही महाराष्ट्र नवनिर्माण सेना बळीराजासोबत ठाम उभे आहोत. पण अशा कठीण काळात हवालदिल झालेल्या बळिराजाला आपणाकडून विशेष हेक्टर मदत पॅकेज जाहीर करावे अशी मागणी मनसे रायगड उपजिल्हा अध्यक्ष संदिप ठाकुर यांनी पेण प्रांताधिकारी श्री.प्रविण पवार यांच्याकडे केली.

पेण प्रांताधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने सरसकट पंचनामे करुन सर्व शेतकरी बांधवांना विशेष नुकसान भरपाई देण्यात येईल तसेच कोणताही दुजाभाव न करता सर्व बळिराजांना मदत देण्याचे आदेश देखील देण्यात येतील अशी ग्वाही दिली.

सदर निवेदन देता वेळी मनसे रायगड उपजिल्हा अध्यक्ष संदिप ठाकुर यांच्या सोबत पेण तालुका अध्यक्ष मनोहर पाटील,मनसे महिला तालुका अध्यक्षा गौरी पाटील,पेण तालुका उपाध्यक्ष विजय पाटील,सौरभ पाटील,पंकज पाटील,नितेश पाटील,प्रशांत म्हात्रे,जिते विभाग अध्यक्ष विवेक घरत,वाशी विभाग अध्यक्ष सुहास पवार,हमरापुर विभाग अध्यक्ष नमस्कार भगत,जिते विभाग उपाध्यक्ष कल्पेश पाटील,सापोली शाखा अध्यक्ष प्रणव जंगम तसेच महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

मनसे सदैव बळीराजासोबत

## "संजय वैरागर यांना न्याय द्या" – नेवाश्यात लहुजी सेना व बहुजन समाज रस्त्यावर


**नेवासा** – नेवासा तालुक्यातील सोनई येथे मातंग समाजातील तरुण संजय नितीन वैरागर याच्यावर झालेल्या क्रूर आणि अमानुष अत्याचाराच्या निषेधार्थ दि. २९ ऑक्टोबर २०२५ सकाळी १० वाजता नेवासा येथे भारतीय लहुजी सेना आणि नवबौद्ध बहुजन समाजाच्या वतीने तीव्र रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. या घटनेने परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, पीडितेला न्याय मिळावा यासाठी सामाजिक संघटना आणि बहुजन नेत्यांनी प्रशासनाविरुद्ध जोरदार घोषणाबाजी केली. मिळालेल्या माहितीनुसार, काही गावगुंडांनी संजय वैरागर या तरुणाला उचलून नेऊन त्याच्यावर अमानुष अत्याचार केले. त्याच्या पायावर मोटरसायकल घालून हातपाय मोडले, तसेच चाकूने डोळ्यावर वार करून त्याचे डोळे निकामी केले. एवढेच नव्हे तर त्याच्या शरीरावर लघवी करण्यासारखे घृणास्पद कृत्य करण्यात आले, जे माणुसकीला काळीमा फासणारे आहे. या प्रकरणी आंदोलनकर्त्यांनी आरोपींविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली असून, फरार आरोपींना तात्काळ अटक करावी आणि आरोपींवर मकोका कायद्यान्वये कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनात अनेक मान्यवर नेते उपस्थित होते. त्यात बहुजन नेते संजय वालेकर, भेंडा ग्रामपंचायतीचे सरपंच दादासाहेब गजरे, भारतीय लहुजी सेनेचे राष्ट्रीय



अध्यक्ष बाळासाहेब बागुल, राज्य प्रमुख सुरेशराव आढागळे, राष्ट्रीय सचिव हनीफ पठाण, वंचित आघाडीचे तालुकाध्यक्ष पोपटराव सरोदे, दादासाहेब वैरागर सोनाई जिल्हा अध्यक्ष शांतवन खंडागळे. महिला आघाडी अध्यक्ष ज्योती भोसले, तालुका उपाध्यक्ष दासु आढागळे संजय क्षीरसागर, सोप्निल सोनकांबळे आविनाश आढागळे बंटी पवार लहुजी सेनेचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिरसाट आणि किशोर आढागळे आशोक साळवे सत्यवान खंडागळे सागर आढागळे बबलु आढागळे आदींचा समावेश होता. आंदोलन शांततापूर्ण आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. नेवासा पोलीस स्टेशनचे निरीक्षक महेश पाटील यांनी परिस्थिती अत्यंत कौशल्याने हाताळली आणि नागरिकांना कोणतीही गैरसोय होऊ दिली नाही, याबद्दल उपस्थितांनी त्यांचे विशेष कौतुक केले. आंदोलनानंतर लहुजी सेना आणि नवबौद्ध बहुजन समाजाच्या प्रतिनिधींनी तहसीलदार, पोलिस निरीक्षक आणि जिल्हा पोलिस अधीक्षक यांना निवेदन सादर केले. त्यांनी चेतावणी दिली की जर आरोपींवर लवकरात लवकर मकोका कायद्यान्वये कारवाई झाली नाही, तर आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल आणि त्याची पूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील.

## बेदम मारहाणीत टेम्पो चालकाचा मृत्यू

**बेलापूर** - कत्तल खाण्यास गाय घेऊन चालला म्हणून काही स्वयंघोषित बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी येथील टेम्पोचालकास बेदम मारहाण केली व त्याचे मारहाणीचे व्हिडिओ स्टेटस इंस्टाग्राम ला ठेवल्यामुळे आपली बदनामी झाली या भावनेतून गळनिंब येथील अनिकेत वडीतके याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.याबाबत समजलेली हकीकत अशी की गळनिंब येथील अनिकेत सोमनाथ वडीतके हा 18 वर्षाचा युवक 27 तारखेला गुहा येथून गाय घेऊन कोल्हार मार्गे चाललेला असताना दुपारच्या दरम्यान कोल्हार येथील काही युवकांनी आपण बजरंग दलाचे कार्यकर्ते आहोत असे सांगून टेम्पो आडविला व तू ही गाय कत्तलखान्याला घेऊन चालला असे म्हणून त्याला टेम्पोतून ओढून बेदम मारहाण केली तसेच त्या मारहाणीचे व्हिडिओ आपल्या मित्रांना व्हाट्सअप कॉल करून दाखविला त्यानंतर पोलिसांना 112 कॉल करून या गुन्ह्याची नोंद केली त्यानंतर पोलिसांनी त्यास समज देऊन सोडून दिले अनिकेत घरी आला व त्याला आपला मारहाणीचा व्हिडिओ इंस्टाग्राम व व्हाट्सअप वर ठेवला असल्याचे समजले त्यामुळे तो झालेली बदनामी सहन करू शकला नाही व त्याने गळनिब येथील राहत्या घरातच मंगळवारी दुपारी अकरा वाजता आत्महत्या केली. त्यानंतर त्याचा मोठा भाऊ चैतन्य हा घरी आला असता त्यास अनिकेत घरातच फासावर लटकलेला दिसला त्यांनी तातडीने त्यास खाली घेऊन लोणी येथील प्रवरा हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता तेथील वैद्यकीय अधिकाऱ्याने त्यास मृत घोषित केले त्यानंतर सर्व नातेवाईक दोन्ही पोलीस स्टेशनला गेले व संबंधित आत्महत्या करण्यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करा,त्या शिवाय आम्ही मृतदेहाची उत्तरीय तपासणी करून देणार नाही तसेच मृतदेह ताब्यात घेणार नाही अशी भूमिका घेतली. त्यामुळे अखेर रात्री एक वाजता लोणी पोलीस स्टेशनला त्या चार कार्यकर्ते व इतर दोन अशा सहा व्यक्तीवर



गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे याबाबत विश्व हिंदू परिषद उत्तर नगर जिल्हा यांच्या वतीने एक पत्रक प्रसिद्ध केले असून दिनेश किशोर राखेच्या याने व्यक्तिगत वादातून संघटनेची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न सोशल मीडियावर केल्याचे समजले असून त्याला बजरंग दलाच्या पदातून निलंबित करण्यात आले आहे असे पत्र विश्व हिंद परिषदेच्या वतीने जाहीर करण्यात आले असून या पत्राच्या प्रति बजरंग दल प्रांत संयोजक बजरंग दल जिल्हा संयोजक जिल्हा गोरक्ष प्रमुख बजरंग दल प्रखंड संयोजक जिल्हा पोलीस अधीक्षक अप्पर पोलीस अधीक्षक पोलीस उपाधीक्षक पोलीस निरीक्षक लोणी व राहता यांना देण्यात आलेले आहे दरम्यान मयत अनिकेत घोडके यांच्या नातेवाईकांनी संबंधित आरोपींना तातडीने अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी व समाजात अशी गुंडगिरी करणाऱ्यांना धडा शिकवावा अशी मागणी केली आहे.

## संपादकीय

### निवडणूक आयोगाला ‘संधी’ !

महाराष्ट्रात जेव्हा जिल्हा परिषदा, नगर परिषदा व महापालिकांच्या निवडणुकीची रणधुमाळी उडालेली असेल, तेव्हा देशातील जवळपास निम्म्या भागात मतदार याद्यांमध्ये आमूलाग्र सुधारणांची लगबग सुरू असेल. सर्वाधिक लोकसंख्येचे उत्तर प्रदेश आणि सर्वाधिक क्षेत्रफळाच्या राजस्थानसह तामिळनाडू, पश्चिम बंगाल, केरळ, पुदुच्चेरी ही पुढच्या वर्षी विधानसभा निवडणूक असलेली राज्ये आणि सोबतच मध्य प्रदेश, छत्तीसगड, गोवा, गुजरात, अंदमान आणि निकोबार बेटे, लक्षद्वीप अशा तब्बल ५१ कोटी मतदारांची राज्ये व केंद्रशासित प्रदेश मिळून बारा प्रांतांमध्ये ‘स्पेशल इन्टेन्सिव्ह रिव्हिजन’ म्हणजे एसआयआरची घोषणा निवडणूक आयोगाने सोमवारी केली. आसाममध्येही पुढच्या वर्षी निवडणूक होत असली तरी त्याचा तूर्त या अभियानात समावेश नाही. त्यासाठी तिथे नागरिकत्वाच्या वेगळ्या कालमर्यादेचे कारण देण्यात आले आहे. महाराष्ट्रात सगळेच विरोधी पक्ष सदोष मतदार याद्यांमध्ये सुधारणेची मागणी करीत असले तरी निवडणूक आयोगाने ती मागणी फेटाळली आहे. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे कारण पुढे केले आहे.

एसआयआरचा प्रयोग सध्या विधानसभा निवडणूक होत असलेल्या बिहारमध्ये नुकताच झाला. म्हणून या बारा प्रदेशांच्या अभियानाला एसआयआर-२ म्हटले जात आहे. ४ नोव्हेंबरपासून बीएलओ घरोघरी जातील. नागरिकांची कागदपत्रे तपासतील आणि त्यानुसार अपात्र, मृत मतदारांची नावे वगळतील, नव्यांची वाढवतील. जुन्या याद्यांमध्ये आमूलाग्र बदल होतील. कमाल बाराशे मतदारांची नवी मतदान केंद्रेही निश्चित होतील, प्राथमिक मतदार यादीचे प्रकाशन, त्यावर आक्षेप व हरकती, त्यांवर सुनावणी आणि अंतिम यादीचे प्रकाशन ही प्रक्रिया ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पूर्ण केली जाणार आहे. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जानेवारीअखेर पूर्ण करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आहेत. म्हणूनच प्रारंभी महाराष्ट्रातील रणधुमाळी आणि एसआयआर-२ च्या लगबगीचा उल्लेख केला. यापूर्वी २००२-०४ दरम्यान असे याद्यांचे शुद्धीकरण झाले होते.

आता दोन तपांनंतर हे अभियान राबविले जात असताना निवडणूक आयोगावर काही आक्षेप घेतले जात आहेत आणि त्याचा संबंध बिहार एसआयआरमधील गोंधळ तसेच राज्याराज्यांमध्ये मतदार याद्यांबाबतच्या आरोपांशी आहे. बिहारमध्ये नागरिकत्वाचा पुरावा म्हणून आधार कार्ड ग्राह्य धरण्यावरून गदारोळ झाला. सर्वोच्च न्यायालयाने वारंवार दटावल्यानंतर निवडणूक आयोग त्यासाठी तयार झाला. नव्या याद्यांच्या निर्मितीत अजिबात पारदर्शकता नसल्याचा आरोप पहिल्या दिवसापासून झाला. या याद्या कशा तयार केल्या जात आहेत हे सोशल मीडियावर देशाने पाहिले. ६५ लाख नावे वगळण्यात आली. त्यात प्रामुख्याने अल्पसंख्याक, अनुसूचित जाती-जमाती, महिला व गरिबांचा समावेश होता. हजारो जिवंत मतदारांना मृत दाखविले गेले. न्यायालयाने अशा मतदारांच्या याद्या गावच्या चावडीवर जाहीर करण्याचे आदेश दिले. तब्बल ८९ लाख आक्षेपांना आयोगाने व्हॉट्सॲपवर उत्तरे दिली; परंतु आयोगाच्या वेबसाइटवर त्या आक्षेपांची नोंद केली नाही आणि आता बिहार एसआयआरबद्दल शून्य आक्षेप नोंदले गेल्याचे सांगून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी स्वतःचीच पाठ थोपटून घेतली आहे. यामुळेच एसआयआर-२ बद्दल साशंकता व्यक्त केली जात आहे.

पश्चिम बंगाल, तामिळनाडू या विरोधकांची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये बिहारप्रमाणेच विशिष्ट समूहांना डावलण्याचा प्रयत्न होईल, ही विरोधकांची मुख्य शंका आहे. अर्थात, आता विरोधकही अशा प्रयत्नांचा सामना करण्यासाठी सज्ज असल्याचे काल, सोमवारीच मुंबईत उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात दिसून आले. आपण सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या हातचे बाहुले नाही, हे सिद्ध करण्याची नामी संधी एसआयआर-२ च्या निमित्ताने निवडणूक आयोगासाठी चालून आली आहे. राज्याराज्यांमध्ये तिथल्या राजकीय पक्षांना विश्वासात घेऊन मतदार याद्यांचे शुद्धीकरण केले गेले तर आयोगाची विश्वासार्हता वाढेल. रोमन सम्राट ज्युलिअस सीझर याने त्याची दुसरी पत्नी पोम्पिया हिला घटस्फोट देताना उच्चारलेले ‘सीझर्स वाइफ मस्ट बी अबॉव्ह सस्पिशन’ हे वाक्य सांगते की, सत्ताधारी व प्रभावशील व्यक्तींनी नैतिकदृष्ट्या प्रबळ आणि विश्वासार्ह असावे लागते. मतदार याद्या, निवडणूक प्रक्रिया, एकूणच लोकशाही हा सगळा जबाबदारीचा कारभार पाहणाऱ्या निवडणूक आयोगाला ही म्हण सध्या तंतोतंत लागू पडते. अशा घटनात्मक व स्वायत्त संस्थादेखील संशयाच्या पलीकडे म्हणजे संशयातीत असाव्यात, ही अपेक्षा आहे.

## जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदी सचिन गुजर यांची नियुक्ती



महाराष्ट्र जीत

**श्रीरामपूर** - काँग्रेसच्या अहिल्यानगर ग्रामीण प्रभारी जिल्हाध्यक्षपदी सचिन गुजर यांची नुकतीच निवड झाली आहे. त्याबाबतचे पत्र माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात,प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मान्यतेने नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. सचिन गुजर हे गेल्या ३० वर्षांपासून काँग्रेस पक्षाचे काम करत आहेत त्यामध्ये त्यांनी युवक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून तेरा वर्ष तर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून सात वर्ष काम पाहिले ते गेल्या पाच वर्षांपासून जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत होते. माजी मंत्री बाळासाहेब थोरात व माजी आमदार स्वर्गीय जयंतराव ससाणे यांचे विश्वासू सहकारी म्हणून त्यांची ओळख आहे. गुजर यांनी सहकार क्षेत्रात देखील काम केलेले आहे त्यामध्ये मुळा प्रवरा वीज संस्थेचे व्हाईस चेअरमन, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती, सभापती अशोक कारखान्याचे संचालक, गणेशखिंड देवस्थानचे विश्वस्त व गुजरवाडी येथील हनुमान गडाचे कार्याध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. जगप्रसिद्ध असलेल्या साईबाबा संस्थानच्या विश्वस्त म्हणून त्यांनी काम पाहिले. विशेषतः श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघात माजी आमदार भानुदास मुरकुटे, जयंतराव ससाने, भाऊसाहेब कांबळे, लहू कानडे, आमदार हेमंत ओगले यांच्या विधानसभा निवडणुकीमध्ये त्यांनी विशेष मेहनत घेतली व या सगळ्याच निवडणुकांमध्ये काँग्रेस उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी झाले आहे. तळागाळातील सर्वसामान्य जनतेशी थेट संपर्क ठेवून काम करणारा नेता म्हणजे सचिन गुजर अशी त्यांची ओळख आहे. स्व. जयंत ससाणे आणि त्यानंतर युवा नेते करण ससाणे यांच्या खांद्याला खांदा लावून ते श्रीरामपूर मध्ये काम करत आहे. त्यांची काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याने निश्चितच त्याचा फायदा येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये होणार आहे. सचिन गुजर यांची माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, आमदार हेमंत ओगले, युवा नेते करण ससाने, जिल्हा काँग्रेसचे शहराध्यक्ष दिप चव्हाण, प्रभावती ताई घोगरे, लताताई डांगे,प्रतापराव शेळके,बाबासाहेब दिघे, ज्ञानेश्वर मुरकुटे,सुधीर नवले, संपतराव मस्के, अंजूम भाई शेख,सलीमखान पठाण आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## सामाजिक कार्यकर्ते वैभव दिलीप बाटिया यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा....

महाराष्ट्र जीत

**शिर्डी ..**

नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांचे विश्वासू. सावळी विहिरीचे माजी उपसरपंच व सामाजिक कार्यकर्ते दिलीप शेठ बाटिया यांचे सुपुत्र वैभव बाटिया यांचा वाढदिवस मोठ्या धुमधडाक्यात सावळीविहीर येथे साजरा करण्यात आला. बाटिया कुटुंब सामाजिक क्षेत्रात सतत अग्रेसर असल्यामुळे सावळी विहीर व पंचक्रोशीमध्ये त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. शांत व संयमी वडिलांप्रमाणेच त्यांचे दोन मुले वैभव व वैजयंत यांनी सामाजिक . धार्मिक व व्यावसायिक क्षेत्रात नावलौकिक कमावले आहे. वैभव बाटीया यास वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यास सावळी वीहीर चे सरपंच ओमेश जपे. अखिल भारतीय सरपंच महासंघाचे राज्याचे उपाध्यक्ष बाळासाहेब जपे.सुरेश दादा जपे. आरपीआयचे जिल्हाध्यक्ष पप्पूभाऊ बनसोडे. सावळीविहिर चे उपसरपंच विकास जपे. दिलीपराव सदाफळ. कैलास सदाफळ. सावळीवीहीर खुर्द चे. महेश राव जमधडे. अमोल कवडे साहेब. गणेश बनसोडे. गणेश आगलावे. स्वप्निल पारडे. पंकज गाढवे. संजय जपे. शांताराम जपे. राजेंद्र आगलावे. शिवाजीराजे आगलावे. सुरेश वाघमारे. फकीरा शेठ लोढा. शरदराव मते. काका मते. . पंचक्रोशीतील सरपंच. ग्रामपंचायत सदस्य. सावळीविहिर येतील सामाजिक संघटना. तरुण मंडळे. महिला मंडळ . व्यापारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. आलेल्या सर्व मान्यवरांकडून बाटिया कुटुंबा चा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आलेल्या सर्व पाहुण्यांकरिता भोजनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता.

## वाशीमच्या भीम कन्येने आफ्रिकेत फडकाविला तिरंगा.

### भारताचे नाव केले रोशन जिल्हाभरात होत आहे अभिनंदन

महाराष्ट्र जीत

**वाशीम(प्रविण पट्टेबहादुर)**

तालुक्यातील असलेल्या तोंडगाव येथील भीमकन्या संगीता मारोती ढोले ही वाशीम पोलीस दलात पोलीस म्हणून कार्यरत असून आफ्रिका केप टाऊन आफ्रिका येथे नुकत्याच पार पडलेल्या वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२५ क्लासिकल व इक्युप पॉवरलिफ्टींग स्पर्धेत भारताचे नेतृत्व करीत आपल्या जिद्दीच्या जोरावर जगाला थक्क करीत गोल्ड आणि ब्रॉन्झ मेडल पटकावून भारत देशाचा तिरंगा फडकावून वाशीम चे नाव जगाच्या पाठीवर झळकावले आहे. दक्षिण आफ्रिकेत केप टाऊन दि.१० ते १९ ऑक्टोबर २०२५ रोजी पार पडलेल्या वर्ल्ड चॅम्पियनशिप क्लासिकल पावललिफ्टींग स्पर्धेत ४२ देशातील खेळाडू बरोबर वाशीम पोलीस दलातील संगीता मारोती ढोले यांनी ४७ कीलो



वजन गटात उत्कृष्ट कामगिरी करीत गोल्ड आणि ब्रॉन्झ मेडल पटकावून वाशीम जिल्ह्यांचे नांव जगाच्या पाठीवर झळकावले आहे.त्यामुळे संगीता मारोती ढोले यांनी नुसती वाशीम जिल्ह्याचीच नव्हे तर भारत देशाची मान उंचावून देशाची शान राखली आहे.संगीता ढोले यांनी जगाच्या पाठीवर नांव झळकावले म्हणून वाशीम मध्ये आंबेडकरी चळवळीतील नेते रामप्रभू सोनोने,मधुकरराव जुमडे, दौलतराव हिवराळे,माणिकराव सोनोने, प्रतिमा सोनेने, बबनराव खिल्लारे, राजकुमार पडघान, प्रविण पट्टेबहादूर,माधव डोंगरदिवे,अरविंद पडघन,हेमंत तायडे,राजू सरतापे,विनोद राजगुरू, समाधान अवचार,एड. पी.पी.अंभोरे,एड.माधव वैद्य,एड. भास्कर इंगळे, पीएसआय मारुती भवाळ,एड.निरंजन इंगोले,एड. अविनाश खंडारे यांचेसह अनेकांनी भीमकन्या संगीता मारोती ढोले हरीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. विशेष म्हणजे संगीता ढोले यांची दक्षिण आफ्रिकेत निवड झाली त्यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे वतीने सत्कार करून उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या होत्या.या नेत्रदीपक कामगिरी मुळे भीमकन्या संगीता मारोती ढोले यांचे सर्वत्र कौतुक होवून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## झिरो माईल वरील नवा इतिहास !

महाराष्ट्र जीत

**-पुरुषोत्तम आवारे पाटील**

राजकारणातील पराभव आणि निवडणुकीतील पराजय यात फरक असतो हे ज्या नेत्याला समजले तो आपले राजकारण अधिक लोकाभिमुख करीत जातो. आपल्या राजकारणाच्या प्रत्येक मोहिमेत लोकांचा सहभाग नोंदवून पुढे जात असतो. हे राजकारण मतदान यंत्रावर टिकेल की नाही याची त्याला पर्वा नसते परंतु लोकभावनेवर त्याचे अस्तित्व अधिक मजबूत व्हावे असा त्याचा प्रयत्न असतो. हाच प्रयत्न २०१४ ते १९ या काळात आंध्रप्रदेशात जगनमोहन रेड्डी नावाचा तरुण करीत होता. त्याचा राजकीय लाभ झाला. राज्यात बच्चू कडू हा तरुण वर्गात प्रचंड लोकप्रिय असणारा नेता सध्या त्याच आहे.कथित राजकीय जाणकार,विश्लेषक आणि टीकाकार किंवा टीव्हीच्या चर्चेत बसून बच्चू कडूंच्या हालचालींना केवळ राजकारण हे लेबल चिकटवून डिबेट जिंकणारे विद्वान काहीही म्हणू द्या परंतु बच्चू कडू यांनी राज्यभरात पदयात्रा काढीत लोकांच्या दुःखाचे जे गाठोडे जमा केले आहे ,त्याचा लाव्हारस नक्कीच त्याची धग दाखवून देणार आहे याचे प्रतिध्वनी उमटायला सुरुवात झाली आहे.

अमरावती जिल्ह्यातील अचलपूर मतदार संघातून चारवेळा अपक्ष आमदार निवडून येणे तोंडाचा खेळ नाही ,पाचव्या वेळी बच्चू कडू निवडणुकीत पराजित झाले. तेव्हापासून त्यांच्या लक्षात आले की लोकांच्या प्रश्नावर भिडणे याला पर्याय नाही. मुळात ज्याचे नेतृत्व काळ्या मातीतून आणि तिने दिलेल्या शिकवणुकीतून पुढे आले अश्या नेत्याला शेती,मातीचे प्रश्न कुणाकडूनही समजून घेण्याची किंवा त्यासाठी कोचिंग नाही. बच्चू कडूंच्या ही बाब लक्षात आल्यावर त्यांनी पहिला लढा तुकडोजी महाराजांच्या मोझरीत उभारला. शेतकऱ्यांसाठी अन्नत्याग आंदोलन करून सुरुवात केली. महात्मा गांधी म्हणत होते ; कर के देखो ' बच्चू कडूंनी सुरुवात केली. सत्तेत आणि विरोधात असणारी सगळीच शेतकऱ्यांची लेकरे मात्र तिला कुणीही विचारायला तयार नाही हे भयंकर वास्तव लक्षात आल्यावर कडू यांनी एक पाऊल पॉल पुढे टाकताच आलेल्या शेतकऱ्यांच्या हजारो पावलांनी बळ दिले. त्यातून उदयास आला शेतीमातीचा नवा निर्णायक लढा.

आता निर्वाणीचा लढा बच्चू कडूंना पुकारत होता. त्यासाठी त्यांनी ' शेतकरी,शेतमजूर हक्क यात्रा ' असे राज्यव्यापी नियोजन केले. सोबतीला दिव्यांग,मेंढपाळ आणि मच्छीमारांचे प्रश्न घेऊन सुरुवात केली. पाहता पाहता या माणसाने पंचेचाळीस दिवसात २७ जिल्हे पिंजून काढले आणि सहा हजार तीनशे किलोमीटर पदयात्रा काढून दीडशेवर जाहीर सभा घेत साडेदहा लाख शेतकऱ्यांचा सहभाग वाढवत हजारो दिव्यांग,गरजू,गरीब ,व्यवस्थेने तुडवलेले अश्या लोकांची भेट घेत प्रश्न,समस्या,दुःख,अडचणी आणि वेदनेचे भलेमोठे गाठोडे जमा केले आहे. 'लोगो का गम देखा तो मै अपना गम भूल गया ' याचा साक्षात्कार या नेत्याला झाला. बच्चू कडून याना गेल्या वीस वर्षातला आमदार म्हणून राजकीय अनुभव मोठा आहे. सरकार आणि विरोधक कसे राजकारण करतात याचे खाचखळगे त्यांना अवगत आहेत. त्यामुळे आता केवळ तोंडी वल्गना नव्हे तर अभूतपूर्व लोकशक्ती आणि त्यांचा विद्रोह सरकारला दाखवून द्यावा लागणार आहे तरच पुढच्या काळात शेती आणि शेतकऱ्यांचे भले होईल ही जाण त्यामागे होती.

बच्चू कडू यांनी दिड महिने राज्यात फिरून जो लोकसंग्रह केला त्याकडे माध्यमांनी जरी दुर्लक्ष केले असले तरी त्या त्या जिल्ह्यात मोठा झंझावात तयार झाल्याचे दिसले. बच्चू कडू हा असा एकमात्र नेता आहे की ज्याला विदर्भ वगळता सर्वत्र मोठी मान्यता आहे. त्यांच्या एकेका सभेला पाच हजार ते पन्नास हजार असा जनसमुदाय गोळा झाला. एरवी एवढी गर्दी जमवायला इतर कोणत्याही पक्षाला कोट्यवधी रुपये खर्च करावे लागतात. कोणत्याही नेत्याच्या सभेला पाचदहा हजार लोक जमवणे अलीकडे सोपे राहिले नाही . इव्हेन्ट कंपन्या त्यासाठी कोटींचे बजेट देतात. मात्र बच्चू कडू सोबत पदयात्रेत दीड ,दोन हजारांचा समुदाय असतो ,त्यासाठी काळजाची माया आणि कृतीचे इंधन खर्च करावे लागते. विदर्भ, मराठवाडा सोडा ,थेट कोकण,उत्तर महाराष्ट ,पश्चिम महाराष्ट्र या वैदर्भीय नेत्याच्या सभा,पदयात्रेला मोठी गर्दी करतो तेव्हा ' कुछ तो खास है ' याचा प्रत्यय यायला लागतो. नवी मुंबई,पनवेल आणि ठाण्यात ओसंडून वाहणाऱ्या सभा बघितल्या की अशी लोकप्रियता विदर्भवीर जांबुवंतराव धोटेंना सुद्धा मिळाली नव्हती याची खात्री पटते.

दौरा राज्याचा असो की देशाचा ,त्यातून लोक कळायला लागतात,त्यांचे चेहरे वाचायला मिळतात ,कानाकोपऱ्यातील सूक्ष्मसमस्या ,भाषा,संस्कृती,लोकांचे स्वभाव समोर येतात. राहुल गांधींनी पदयात्रा केल्यावर ,जगनमोहन यांनी आंध्र भ्रमण केल्यावर त्यांच्या व्यक्तिमत्वात मोठा बदल झाला. बच्चू कडू सुद्धा त्याला अपवाद नाहीत. लोकांच्या प्रश्नांचे ,दुःखाचे ,वेदनेचे कारुण्यमयी दालन त्यांना अनुभवायला मिळाले ,त्यातून बच्चू कडू यांचे नेतृत्व अधिक कणखर होण्यात मदत झाली. शेतकऱ्यांचा अंतिम लढा कदाचित या वेदनेतूनच जन्माला आला असावा. दोन दिवसांनी म्हणजे २८ ऑक्टोबर पासून बच्चू कडू यांचे नागपुरात राज्यव्यापी ऐतिहासिक एल्गार आंदोलन सुरु होत आहे. त्यासाठी नागपुरातील झिरो माईल सज्ज झाला आहे. नागपूर हे देशाचे मध्यवर्ती ठिकाण आहे. इंग्रजांनी इथूनच देशाचे अंतर मोजायला सुरुवात केली होती ,ती जिथून झाली त्याला झिरो मेल म्हणतात. हा झिरो मैल नवा इतिहास लिहिणार आहे.

दिल्लीच्या सीमेवर हरियाणा पंजाब मधील शेतकऱ्यांनी जे ठिय्या आंदोलन केले होते ,त्याचीच महाराष्ट्र आवृत्ती नागपुरात बच्चू कडून घडवणार आहेत. जोवर मागण्या मान्य होत नाहीत तोवर नागपुरातून हजारो शेतकरी,मेंढपाळ,दिव्यांग आणि मच्छिमार उठणार नाहीत असे त्यांनी ठरवले आहे. त्यासाठी पुढचे दोन महिने नागपुरात मुक्काम ठोकावा लागला तरी कुणालाही काही कमी पडणार नाही याची तयारी केली जात आहे. नागपुरातील चार गुरुद्वारानी दहा हजार शेतकऱ्यांना पुढचे तीन महिने लंगर देण्याचे मान्य केले आहे. त्यासाठी विदर्भातील घराघरातून शेतकरी मूठभर धान्य सोबत घेऊन जाणार आहेत. हा लढा म्हणजे देशव्यापी किसान लढ्याची नांदी आहे. बच्चू कडू यांनी सगळे शेतकरी नेते एकत्रित केले आहेत. त्यासाठी लागणारी सगळी सामुग्री गोळा करण्याचे काम दोन महिने सुरु आहे. उपराजधानी नागपूर आणि काही काळात राज्य प्रभावित करण्याचे सामर्थ्य या आंदोलनाने निर्माण केले आहे.

-पुरुषोत्तम आवारे पाटील
संवाद -9892162248

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

१ २ ३ ४ ५ ६

# छत्रपती शिवरायांची माफी मागून आत्मक्लेश आंदोलन करणार- शिवसेना उपजिल्हाप्रमुख सचिन बडदे

महाराष्ट्र जीत

श्रीरामपूर - छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण दोन तारखेला भाजी मंडई या ठिकाणी होणार आहे त्या अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा शिवाजी चौकात आम्ही बसवू शकलो नाही त्यासाठी आम्ही श्रीरामपूरकर कमी पडलो म्हणून छत्रपती शिवरायांची माफी मागून एक तारखेला सकाळी नगरपालिकेच्या आवारामध्ये छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यासमोर माफी मागून आत्मक्लेस आंदोलन करणार अशी माहिती शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख सचिन बडदे यांनी दिली या आंदोलनात सर्व शिवप्रेमी, शिवसैनिक व श्रीरामपुरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हाने त्यांनी केले यावेळी त्यांनी असे सांगितले की लोकसभेच्या वेळी स्वतः परमपूज्यनीय रामगिरी महाराज यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी रोड या ठिकाणी चौकामध्ये छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचा भूमिपूजन झाले मग ते काय फक्त खासदारकी पुरते होते की काय त्यानंतर आज पुन्हा एकदा नगरपालिकेच्या निवडणुकीपूर्वी भाजी मंडई या ठिकाणी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण होत आहे ते पण पूर्ण राजकीय असून जनभावनेचा जी मागणी आहे त्याला पूर्ण विरोध करून फक्त बहुमताच्या आणि सत्तेच्या जोरावर भाजी मंडई या ठिकाणी हा कार्यक्रम आयोजित होत आहे हा सर्व जनतेच्या भावनेचा खेळवाड आहे.

स्वर्गीय जयंतराव ससाणे यांनी भाजी मंडई या ठिकाणी त्याचवेळी परमिशन दिली होती पण जनभावना त्या ठिकाणी पुतळा बसवण्यास अनुकूल नव्हती त्यामुळे त्यांनी कधीही तो निर्णय जनतेवर लादला नाही किंवा रेटला नाही आज ते असं सांगत आहे की चौकामध्ये पुतळा बसण्यास अडचण आहे पण हे साफ खोटे आहे कारण बेलापूर रोडवरील डावखर चौक या ठिकाणी चौक एकदम छोटा असताना त्या ठिकाणी एक पुतळा आणि चौक सुशोभीकरण करण्यात आले आहे व एका बाजूला वेगळा नियमाने दुसऱ्या बाजूला वेगळा नियम असं कसे होऊ शकते त्यामुळे या सर्व गोष्टी जनतेच्या समोर याव्या आणि शिवप्रेमींना याची माहिती व्हावी म्हणूनच आम्ही सर्वांनी आत्मक्लेष आंदोलन करण्याचे ठरविले आहे अशी माहिती शिवसेना उपजिल्हाप्रमुख सचिन बडदे यांनी दिली.



## पोलीस स्टेशन भोकर यांच्या वतीने 31 ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय एकता दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

महाराष्ट्र जीत

भोकर :- पोलीस स्टेशन भोकर यांच्या वतीने 31 ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय एकता दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षीस व ट्रॉफी प्रदान करण्यात येणार आहे. त्यासाठी जास्तीत जास्त खेळाडूसह युवक युवतीने या स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन
पोलीस निरीक्षक श्री. अजित कुंभार यांनी केले आहे. राष्ट्रीय एकता दिवसाचे औचित्य साधून पोलीस स्टेशन भोकरतर्फे दि. 31 ऑक्टोबर रोजी सकाळी 06.00 वाजता मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा भोकर शहरातील उमरी चौक - वस्ताद लहुजी चौक - छत्रपती शिवाजी महाराज चौक - डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते पोलीस स्टेशन भोकर पर्यंत दोन किलोमीटर अंतराची राहणार असून या स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांचे हस्ते पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे. त्यामध्ये ट्रॉफी आणि उत्तेजनार्थ विजेत्यांना प्रशस्तीपत्र व ट्रॉफी दिली जाणार आहे. तरी या मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक स्पर्धकांनी पोलीस स्टेशन भोकर येथे रूम नंबर 21 मधील पोलीस अंमलदार परमेश्वर गाडेकर यांच्याकडे आपल्या ओळखपत्रासह नाव नोंदणी करावी असे आवाहन पोलीस स्टेशन भोकर चे पोलीस निरीक्षक श्री अजित कुंभार यांनी केले आहे.

# समिंद्रा फाउंडेशन तर्फे अनाथ,पुरग्रस्त,सफाई कामगार यांना मिठाई भेट

महाराष्ट्र जीत

बेलापूर - समिंद्रा फाउंडेशनच्या वतीने माऊली वृद्धाश्रम,श्री साई विठ्ठल अनाथ आश्रम,बेलापूर ग्रामपंचायत कर्मचारी, बेलापुरातील घिसाडी समाज अशा समाजातील गोरगरीब, वृद्ध तसेच अनाथांना दिवाळीचे फराळ त्याचबरोबर कपड्यांचे वाटप करण्यात आले.



समिंद्रा फाउंडेशनचे अध्यक्ष सदाशिव थोरात यांच्या नेतृत्वाखाली दरवर्षी समाजातील गोरगरीब जनतेची दिवाळी गोड व्हावी या दृष्टिकोनातून दिवाळीचा फराळ त्याचबरोबर कपडे वाटप कार्यक्रम राबविण्यात येतो. याही वर्षी समिंद्रा फाउंडेशनच्या वतीने बीड या ठिकाणीही पूरग्रस्त त्याचबरोबर नुकसानग्रस्त शेतकरी यांनाही मदत करण्यात आली समिंद्रा फाउंडेशनचे अध्यक्ष सदाशिव थोरात हे पुणे येथे प्राध्यापक असून ते पुण्यात विविध नागरिकाकडून कपडे सामान रोख स्वरूपात निधी जमा करतात व त्याचे वितरण ग्रामीण भागात जाऊन गोरगरिबांना करतात त्याच धर्तीवर त्यांनी या ही वर्षी श्रीरामपूर तालुक्यात विविध ठिकाणी फराळ त्याचबरोबर कपड्यांचे वाटप केलं. श्रीरामपूर येथील माऊली आश्रम वृद्धाश्रम आश्रम त्याचबरोबर बेलापूर गोखलेवाडी येथील श्री साई विठ्ठल अनाथ आश्रम येथील वृद्धांना व अनाथ बालकांना कपडे त्याचबरोबर मिठाईचे वाटप करण्यात आले तसेच बेलापूर ग्रामपंचायत येथे ग्रामपंचायत सफाई कर्मचारी तसेच घिसाडी समाज बांधवांना बेलापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष भास्कर खंडागळे बेलापूरचे सर उपसरपंच चंद्रकांत नवले ग्राम विकास अधिकारी निलेश लहारे तसेच समिंद्रा फाउंडेशनचे संचालक श्वेता घोडके बबनराव तागड अण्णासाहेब पवार यांच्या हस्ते दीपावली फराळ वाटप करण्यात आले सदर कार्यक्रमात कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद सदस्य शरदराव नवले गावकरी पक संस्थेचे चेअरमन अभिषेक खंडागळे सरपंच मीनाताई साळवी ज्येष्ठ पत्रकार देविदास देसाई यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# डॉ.बागुल यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु म्हणाल्या "तुमच्याकडे बघून माझ्यातला शिक्षक जागा झाला."

## राष्ट्रपती भवनात डॉ.बागुल यांना बॅज प्रदान

महाराष्ट्र जीत

**अहिल्यानगर-** राष्ट्रपतींची वाट पाहत हातात गुलाब घेऊन उभे असलेले देशभरातील निवडक शिक्षक,कलाकार.. एवढ्यात राष्ट्रपतींच्या आगमनाने अमृत उद्यानामध्ये उत्साह संचारतो.. त्यांना अभिवादन करण्यासाठी उत्सुक असलेल्या शिक्षकांमध्ये डॉ.अमोल बागुल यांच्याजवळ जेव्हा राष्ट्रपती येतात तेव्हा बागुल त्यांना म्हणतात की "1994 ते 97 या कालावधीत आपण रायरंगपूरमध्ये शिक्षिका होतात आणि आज तर समस्त भारताच्या शिक्षिका झालेल्या आहात."हे ऐकून राष्ट्रपती महोदया आनंदाने नमूद करतात की "तुमच्याकडे बघून माझ्यातला शिक्षक जागा झाला." शुभेच्छा संदेश व आशीर्वाद देतात... असे चित्र होते राष्ट्रपती भवनाच्या वतीने आयोजित निमित्त शिक्षक ,कलाकार सन्मान उपक्रमाचे.भवनाच्या समाज माध्यमांवर हा व्हिडिओ प्रचंड व्हायरल होत आहे.



या उपक्रमासाठी डॉ.बागुल यांची निवड होऊन विशेष निमंत्रण प्राप्त झाले होते. राष्ट्रपती भवनाच्या वतीने विशेष बॅज व प्रेरणादायी भेटवस्तू प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला."राष्ट्रपतींच्या या अमूल्य भेटीमुळे अजून ऊर्जा मिळाली असून भविष्यात विविध शैक्षणिक, सामाजिक,सांस्कृतिक उपक्रमांमधून भारतीय विद्यार्थी घडवण्याचे काम अजून वृद्धिंगत करणार आहे."असे प्रतिपादन बागुल यांनी केले.येथील राष्ट्रीय अमृत उद्यान येथे संपन्न झालेल्या विविध गुणदर्शन सादरीकरण,राज्य वैशिष्ट्ये सादरीकरण, सांस्कृतिक सोहळा, शिक्षक कलाकृती सादरीकरण आदी उपक्रमांमध्ये डॉ बागुल यांनी सक्रिय सहभाग घेतला. आजपावेतो सुमारे नऊ वेळा डॉ.बागुल यांना राष्ट्रपतींची विशेष निमंत्रणे प्राप्त झालेली आहेत. रायरंगपूर हे ओडिशा राज्यातील मयूरभंज जिल्ह्यामध्ये असलेले एक शहर आहे, जे भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे मूळ गाव म्हणून ओळखले जाते.

# आरटीओ वसंतराव कलंबरकर यांना रत्नागिरी येथे राष्ट्रीय कृषीरत्न पुरस्कार प्रदान

महाराष्ट्र जीत

नांदेड - महात्मा फुले शिक्षण परिषदेतर्फे जाहिर झालेला राष्ट्रीय कृषीरत्न पुरस्कार रत्नागिरी येथे पुर्व ब्रिगेडीयर सुधीर सावंत, कुणबी मराठा समाजाचे प्रदेशाध्यक्ष गिरीशभाऊ जाधव, महात्मा फुले शिक्षण परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष व्यंकटराव जाधव यांच्या हस्ते मोटार वाहन निरीक्षक पुणे मा.श्री. वसंतराव कलंबरकर नांदेड यांना गौरव पत्र, सन्मानचिन्ह देवून राष्ट्रीय कृषीरत्न पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.
वसंतराव कलंबरकर यांनी यावेळी सत्काराला उत्तर देताना म्हणाले की, सेंद्रिय शेती, विषमुक्त अन्नाचे जिवनात अनन्य साधारण महत्व आहे, संगणकाच्या युगात ताणतणावाच्या भांबावलेल्या परिस्थितीत मानव विकृत होत चाललेला आहे, त्याचे कारण प्रदुषित हवा, दुषीत अन्न, दुषीत मानसिकता यावर रामबाण उपाय म्हणजे सेंद्रीय शेती करणे हे होय, असे प्रतिपादन केले. वसंतराव कलंबरकर हे महापुरूषांच्या आचार-विचारांचे सच्चे अनुयायी असून महाराष्ट्र वाहतुक विभागात कर्तव्य बजावत सेवा कार्यक्षेत्राच्या बाहेर जावून समाजात मानवतावादी कार्य करीत असल्यामुळे या पुरस्कारासाठी त्यांची निवड करून पुरस्कार प्रदान करून त्यांना मान्यवरांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर नाट्यग्रह रत्नागिरी येथे महात्मा फुले शिक्षण परिषदेच्या 15 व्या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेत मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करून सन्मानीत करण्यात आले.
यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून मुख्याध्यापक माधवराव रेडेवाड बरबडेकर, प्रा.ज्ञानेश्वर मरकंटे, बबनराव गुबलेवाड, मारोती शिंदे, मोहित रेडेवाड, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच.मिसलवाड, मुख्याध्यापक दादाराव कोठेवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.
राष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठेचा समजला जाणारा हा कृषीरत्न पुरस्कार वसंतराव कलंबरकर यांना प्राप्त झाल्याबद्दल समाजनेते नागनाथरावजी घिसेवाड, पुर्व शिक्षण संचालक डॉ.गोविंद नांदेडे, दिलीप निळेकर, उद्योजक महेश होलानी, रामचंद्र येईलवाड, अशोकराव घोरबांड, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच.मिसलवाड, गोविंदराव घोरबांड, गिरधारी मोळके, गणेशराव घोरबांड, सुरेश घोरबांड, रमेश पिठ्ठलवाड, शिवाजी नाईकवाडे, के.एन.जेठेवाड, लक्ष्मणराव निळकंठे, डॉ.भगवान गुंजलवाड, डॉ.बालाजी आदमपूरकर, बालाजी मसलगेकर, प्रमोद बुक्कावार, गंगाधर घोरबांड, केशवराव कुकूलवाड, शिवाजी पोटेवाड, व्यंकटराव बोईनवाड, गोरखनाथ फसकलवाड, बालाजी बोईनवाड, अहेमद शेख, दिगंबर निळकंठे, संजय पवार, मोहन कलंबरकर, संदीप चिमलवाड, मारोती कोठेवाड, दादाराव कोठेवाड यांच्यासह समस्त आप्तेष्ठांनी अभिनंदन करून पुढील सामाजिक कार्यास शुभेच्छा दिल्या.




# सोयगाव तहसीलला ठोकले कुलूप ; सोयगाव शहरातील घटना

महाराष्ट्र जीत

**सोयगाव;**-सोयगाव सह तालुक्यात झालेल्या सप्टेंबरमध्ये अतिवृष्टीच्या नुकसानीची मदत व कर्जमाफी ची घोषणा होत नसल्याने बुधवारी( दि.२९) संतप्त शेतकऱ्यांनी सकाळी साडे दहा वाजता सोयगाव तहसील कार्यालयाला थेट कुलूप ठोकून तालुका प्रशासनाचा व शासनाबद्दल संताप व्यक्त केला दरम्यान सकाळी साडे दाह वाजता लावलेले कुलूप दुपारी दोन वाजेपर्यंत होते त्यामुळे तब्बल चार तास सोयगाव तहसील कुलूपबंद होते तालुक्यात आगस्ट व सप्टेंबर या दोन महिन्यात अतिवृष्टी मुळे नुकसान झाले आहे दरम्यान दोन महिन्यांपासून नुकसानीची भरपाई मिळत नसून जळगाव जिल्ह्यातील शेजारच्या तालुक्याना मात्र ही मदत मिळाली मात्र सोयगावला का नाही असा संतप्त सवाल या शेतकऱ्यांनी केला आहे दरम्यान तहसीलदार हजर नसल्याने तहसीलदार कार्यालयात येईपर्यंत कुलूप न उघडण्याचा निर्णय संतप्त शेतकऱ्यांनी घेतला होता त्यामुळे महसूल कर्मचाऱ्यांना बाहेर बसून तहसीलदार यांची प्रतीक्षा करावी लागली होती शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून संतप्त पाचशे ते सहाशे संतप्त शेतकऱ्यांनी सरकार विरोधी घोषणा बाजी करत थेट तहसील कार्यालय गाठून तहसील कार्यालयाच्या दरवाजाला कुलूप ठोकले शेतकरी रविंद्र काळे, ऍड योगेश पाटील,विजय काळे,राजेंद्र काळे,राजू दुतोंडे,पूनम परदेशी यांच्या नेतृत्वाखाली पाचशे ते सहाशे शेतकऱ्यांनी थेट सोयगाव तहसीलला कुलूप ठोकले होते दरम्यान यावेळी तहसील कार्यालयाच्या आवारात शेतकऱ्यांनी घोषणा बाजी केली होती दरम्यान दुपारी दोन वाजता तहसीलदार मनीषा मेने या घटनास्थळी आल्यावर त्यांनी विजय काळे,ऍड योगेश पाटील, रविंद्र काळे,राजेंद्र काळे यांचेशी चर्चा करून बाधित शेतकऱ्यांच्या अनुदानाची रक्कम बाबत अद्याप अध्यादेश आलेला नाही याद्या अपलोड झालेल्या आहेत फार्मर आय डी काढलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात अध्यादेश येताच अनुदान जमा होण्याची प्रक्रिया सुरू होईल असे आश्वासन दिले व कुलूप उघडण्यात आले. सोयगाव तहसीलदार मनीषा मेने या व्ही सी साठी असल्याचे बोलले जात होते परंतु तहसील ला कुलूप ठोकून ही तहसीलदार गैरहजर होत्या त्यामुळे तहसीलदार मनीषा मेने जोगदंड यांच्या बद्दल शेतकऱ्यांनी रोष व्यक्त केला अखेरीस दुपारी दोन वाजता तहसीलदार मेने या पोलीस बंदोबस्तात तहसील कार्यालयात दाखल झाल्या त्यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी त्यांना अतिवृष्टी च्या नुकसानीची मदत दोन दिवसात खात्यात वर्ग करा,कर्जमाफीचा शासनाने लवकर निर्णय घ्यावा, पीकविमा मंजूर करावा यासह विविध पाच मागण्यांचे निवेदन दिले यावेळी विजय काळे,ऍड योगेश पाटील, रविंद्र काळे,बंटी काळे,राजू दुतोंडे, अरुण सोहनी,पूनम परदेशीं, पुंडलिक मानकर,अनिल चौधरी, कृष्णा पाटील,अमोल मापारी,अनिल पाटील,राजू बडक,नितीन पाटील,अजय नेरपगारे,भरत काळे,दिलीप चौधरी,संतोष बोडखे,किशोर मापारी,संतोष सोहनी,जितेंद्र चौधरी,संतोष सोहनी,रामा आगे,राजेंद्र पाटील,भागवत थोटे,विजय गव्हाड,महेश चौधरी,सुरेश मनगटे,शिवाजी चौधरी,आदिसह तालुक्यातील शेतकरी या आंदोलनात सहभागी झाले होते.



# विजय दिनानिमित्त संसद भवनापासून राष्ट्रीय युद्धस्मारकापर्यंत प्रतिकात्मक सायकल रॅलीसाठी खासदाराना हिंदायान चे आमंत्रण

**भिवंडी (सुनील झळके)**

तंदुरुस्ती, शाश्वतता प्रगती आणि राष्ट्राभिमानाचा संगम साधत हिंदायान संस्थेने संसद सदस्यांना संसद भवनापासून ते राष्ट्रीय युद्धस्मारक या दरम्यान २ किमी प्रतिकात्मक सायकल राईडमध्ये सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले आहे. ही सायकल यात्रा रविवार, ३० नोव्हेंबर रोजी विजयदिन साजरा करण्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आली आहे. १९७१ च्या भारत-पाक युद्धातील भारतीय सशस्त्र दलांच्या विजयाच्या स्मरणार्थ, आणि बांगलादेशाच्या मुक्तीसाठी झालेल्या त्या ऐतिहासिक लढ्याच्या गौरवासाठी, क्रीडा व युवक व्यवहार मंत्रालय आणि संरक्षण मंत्रालयाच्या सहकार्याने ही १० किमी हिंदायान सायकल परेड आयोजित करण्यात आली आहे. परेडची सुरुवात चानक्यपुरीतील नॅशनल यूथ हॉस्टेल येथून होईल आणि समारोप इंडिया गेट लगत राष्ट्रीय युद्धस्मारकात होईल.

ही परेड पंतप्रधानांनी उद्घाटन केलेल्या फिट इंडिया मिशनअंतर्गत "संडे ऑन सायकल" या मंत्रालयाच्या अग्रगण्य उपक्रमाचा एक भाग आहे.

"दरवर्षी भारतीय सेना, नौदल, वायुदल आणि टेरिटोरियल आर्मी हिंदायान सायकल मोहिमेत सक्रियपणे सहभागी होतात," असे हिंदायानचे संयोजक व जगप्रदक्षिणा करणारे पहिले भारतीय विष्णुदास चापके म्हणाले. "या वर्षीच्या कार्तव्य पथावरील सायकल परेडसाठी बीएसएफ, सीआरपीएफ, एसएसबी, आयटीबीपी आणि आसाम रायफल्स यांनी सहभाग निश्चित केला आहे. एनआयए, एनसीबी, एनएसजी आणि सीआयएसएफ यांनी देखील त्यांच्या अधिकाऱ्यांकडे मान्यता प्रक्रियेची फाईल पाठवली आहे."

विष्णू चापके पुढे म्हणाले, "राज्यसभा व लोकसभा या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांना सहभागी होण्यासाठी ईमेल आमंत्रण दिले आहे. जे सायकल चालविण्याबात संकोच बाळगतात, त्यांच्यासाठी आम्ही इलेक्ट्रिक सायकली आणि टँडम (दोन आसनी) सायकली उपलब्ध करू. उद्देश एकच – शहीदांना श्रद्धांजली आणि सायकल संस्कृतीला पुन्हा प्रतिष्ठा मिळवून देणे."

सभा स्थळ: रेल भवन, संसद परिसराजवळ
वेळ: सकाळी ८:२५, रविवार, ३० नोव्हेंबर २०२५

जे सदस्य सायकल राईड करू शकत नाहीत, त्यांना राष्ट्रीय युद्धस्मारकावर उपस्थित राहून वीर शहीदांना अभिवादन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सहभागी सदस्यांना त्यांच्या उपस्थितीची पुष्टी hindayan2020@gmail.com या मेलवर पाठविण्याची विनंती करण्यात आली आहे, जेणेकरून वैयक्तिक जर्सी व अन्य व्यवस्था करता येतील.

लेफ्टनंट जनरल अनिल पुरी (निवृत्त) म्हणाले,"१९९० च्या आधी सायकल प्रतिष्ठेचे प्रतीक होते. शिक्षक, पोलीस आणि सशस्त्र दलातील अधिकारी सायकलने प्रवास करीत असत. पण नंतर मोटारसायकल आणि मोपेड आल्याने सायकल कामगारवर्गाचे प्रतीक बनले. संसद सदस्य सायकल चालवतील, तर ते लाखो युवकांना प्रेरणा देतील आणि सायकलिंगचा मान पुन्हा वाढेल."

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून संदीपला मिळाला दिलासा

**प्रतिनिधी / हंसराज भंडारा.**

**भंडारा** – गरजू रूग्णांना वेळेत वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी देवेंद्रजी फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वाखाली जिल्हा कक्षाची स्थापना करण्यात आली. जिल्हा कक्षामुळे गाव, वाडी, वस्ती, पाडे, तांडे येथील गरजू रूग्णांना वेळेत मदत मिळत होत असल्यान दिलासा मिळत आहे, दरम्यान भंडारा जिल्ह्यातील साखळी (ता. तुमसर) येथील संदीप ब्रीजलाल आचरकाटे या तरुणावर तातडीने हिप रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया करण्यात आली.

गेली अनेक दिवसांपासून उपचाराविना रूग्णाचे हाल होत होते. त्यातच त्यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबतची माहिती मिळाली. पुढे संदीप यांनी जिल्हा कक्षाकडे धाव घेतली. त्यातून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सहकार्याने संदीप आचरकाटे यांच्या अर्जावर तातडीने कार्यवाही करण्यात आली.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून रुग्णाला आवश्यक ती वैद्यकीय आर्थिक मदत मंजूर करण्यात आली. त्यातून रूग्णावर यशस्वी शस्त्रक्रिया करता आली. या मदतीमुळे रुग्णाला दिलासा मिळाल्याची भावना रूग्ण व नातेवाईकांनी व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख नाईक यांचे त्यांनी आभार मानले. गरजू रूग्णांनी जिल्हा कक्षात संपर्क साधावा.

# पालकांनी विद्यार्थ्याच्या शिक्षणाकडे लक्ष द्यावे – आ. श्रीजयाताई चव्हाण

**भोकर / प्रतिनिधी**

सक्षम व परीश्रम करणारा पेरकी पेरकेवार पेरकेवाड हा समाज असून सर्वांगीण विकासासाठी पेरकेवाड समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे लक्ष केंद्रित करावे पालकांनी विद्यार्थ्याच्या शिक्षणाकडे लक्ष द्यावे असे आवाहन भोकर मतदार संघाच्या आ. श्रीजयाताई चव्हाण यांनी केले.

भोकर येथे दि.२६ ऑक्टोंबर रोजी गणराज पॅलेस फंक्शन हॉलमध्ये गुणवंत विद्यार्थ्याचा सत्कार सोहळा आयोजीत करण्यात आला . आ . चव्हाण बोलताना म्हणाल्या की पेरकी, पेरकेवार ,पेरकेवाड समाजातील युवकांनी स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे , विद्यार्थी दशेत असताना परिश्रम कष्ट घ्यावे लागते . समाजात शिक्षणाशिवाय विकास होवू शकत नाही, पालकांनी मुलांकडे लक्ष देवून त्यांना घडवले पाहिजे असे मत व्यक्त केले . पेरकेवाड समाजाच्या समस्या सोडवू अशी ग्वाही दिली.

ह्यावेळी आ. शंकरअण्णा पायली अदिलाबाद यांनी समाजात वावरत असताना पालक व विद्यार्थ्यांनी सकारात्मक विचार ठेवले पाहिजे .पुढे जाणाऱ्यांना मागे ओढू नका , समाजाने एकत्र राहण्याचे आवाहन केले .

ह्यावेळी राम तोडेवाडकर , शंकुतलाबाई एंबडवार , संदीप भुरेवार, विजय भुरेवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

गुणवंत विद्यार्थ्याचा सत्कार सोहळा संयोजक, शासकीय कंत्राटदार गोविंदराव उल्लेवाड नागापुरकर यांचा ही समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थी शितल शिंगणवार , प्रशांत डाकेवाड, स्नेहल गोपतवाड, आदित्य बुटनवाड, ओंकार शानमवाड , वैष्णवी शिंगरवाड, आदी विद्यार्थ्यांसह प्रशासनात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात



आला. प्रास्ताविक बालाजी सुबनवार यांनी केले. ह्यावेळी सभापती जगदीश पाटील भोसीकर, माजी सभापती प्रकाशराव देशमुख भोसीकर, भाजपाचे तालुकाध्यक्ष दिवाकररेड्डी सुरकुंटवाड, उपसभापती बालाजी शानमवाड,किशोर पाटील लगळूदकर , रामचंद्र मुसळे, दिलीप देशमुख सोमठाणकर, गणेश पाटील कापसे,शहराध्यक्ष विशाल माने,डॉ बालाजी पाटील अंदबोरीकर , डॉ. मनोज गिमेकर,वेनु कोंडलवार मिर्झा ताहेर बेग,विठ्ठल पाटील धोंडगे ,बाबुराव गोपतवाड , बालाजी पिंगलवाड, मारोती पिंगलवाड, संभाजी आलेवाड,अशोक अनगुलवार,अँड. सुरेश पनसवाड, सटवाजी शेंडगे, मारोती बेरदेवाड, संभाजी आलेवाड,प्रकाश बच्चेवाड राजेश,शिंगनवाड आदींची उपस्थिती होती.

# भोकर येथे राष्ट्रीय एकता दिना निमित्त मॅरेथॉन स्पर्धा

**भोकर / प्रतिनिधी**



पोलीस स्टेशन भोकर यांच्या वतीने 31 ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय एकता दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षीस व ट्रॉफी प्रदान करण्यात येणार आहे. त्यासाठी जास्तीत जास्त खेळाडूसह युवक युवतीने या स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन पोलीस निरीक्षक श्री. अजित कुंभार यांनी केले आहे. राष्ट्रीय एकता दिवसाचे औचित्य साधून पोलीस स्टेशन भोकरतर्फे दि. 31 ऑक्टोबर रोजी सकाळी 06.00 वाजता मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा भोकर शहरातील उमरी रोड रामजी सुभेदार आंबेडकर चौक – वस्ताद लहुजी चौक – छत्रपती शिवाजी महाराज चौक – डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते पोलीस स्टेशन भोकर पर्यंत दोन किलोमीटर अंतराची राहणार असून या स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांचे हस्ते पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे. त्यामध्ये ट्रॉफी आणि उत्तेजनार्थ विजेत्यांना प्रशस्तीपत्र व ट्रॉफी दिली जाणार आहे. तरी या मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक स्पर्धकांनी पोलीस स्टेशन भोकर येथे रूम नंबर 21 मधील पोलीस अंमलदार परमेश्वर गाडेकर यांच्याकडे आपल्या ओळखपत्रासह नाव नोंदणी करावी असे आवाहन पोलीस स्टेशन भोकर चे पोलीस निरीक्षक श्री अजित कुंभार यांनी केले आहे.

# वाशिम जिल्ह्यातील ग्रामसेवक पुरस्कार निवडीत सावळा गोंधळ.

### खरे ग्रामसेवक वंचीत,तर काही अकार्यक्षम ग्रामसेवकांना पुरस्कार.

### आत्माराम पाटील नवघरे यांनी दिला न्यायालयात जाण्याचा इशारा

**वाशीम(प्रतिनिधी)** अनेक वर्षांपासून रखडलेल्या जिल्ह्यातील आदर्श ग्रामसेवक पुरस्कार अखेर संबंधितांनी गैरव्यवहार करून अकार्यक्षम ग्रामसेवकांची आदर्श ग्रामसेवक पुरस्काराची निवड केल्यामुळे ग्रामसेवक संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष आत्माराम पाटील नवघरे यांनी एका निवेदनाद्वारे मुख्यकार्यकारी अधिकारी यांचेकडे गैरव्यवहार करून घोळ झाल्याचा आरोप केला आहे.तो घोळ निपटून खर्या ग्रामसेवकांना पुरस्कार देण्यात यावा अशी मागणी केली आहे. आत्माराम पाटील नवघरे यांनी पुढे निवेदनात असे नमूद केले आहे की,जे ग्रामसेवक आपल्या कर्तृव्यात चोखपणे काम करून जनतेची सेवा करतात.व ग्रामपंचायतची कर वसूली ७५ टक्के करतात.शिवाय मुख्यालय राहतात.महीला ग्रामसभेचे आयोजन करून गाव विकासाची कामे करतात.अशा ग्रामसेवकांना पुरस्कार द्यायला पाहिजे.परंतु जे ग्रामसेवक कामात कामचूकारपण करतात अशा ग्रामसेवकांची आदर्श ग्रामसेवक पुरस्कारासाठी निवड केली.त्यामुळे ही निवड केलेली आदर्श ग्रामसेवक पुरस्काराची प्रक्रिया तात्काळ थांबावी. कारण ही निवड गैरव्यवहार करून केली आहे.त्यामुळे कार्यक्षम ग्रामसेवक हे पुरस्कारांपासून वंचीत राहत आहेत.त्यासाठी निकष ठरवून दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही न केल्यास व ग्रामसेवक यांच्या कार्याची योग्य तपासणी व रेकॉर्ड पाहून योग्य न्याय न दिल्यास न्यायालयात जाण्याचा इशारा ग्रामसेवक संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष आत्माराम पाटील नवघरे यांनी दिला आहे.आणि या न्यायालयात नक्कीच न्यायदेवता न्याय निवाडा करेल असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.

# वऱ्हाडी कट्टा संमेलनात जानवी व आरुषीचा सत्कार

### कामरगावच्या विद्यार्थिनींचे दर्जेदार सादरीकरण

**कारंजा लाड :-** दरवर्षी दिवाळीनंतर येणाऱ्या पहिल्या रविवारी वऱ्हाडी कट्टा या संस्थेतर्फे स्नेहमिलन सोहळा व साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी या सोहळ्यात कामरगाव च्या पी.एम.श्री.जिल्हा परिषद विद्यालयातील तरुण संपादक मंडळाच्या आरुषी भुजाडे व जानवी देशमुख यांनी मुख्याध्यापक प्रा. सुरेश राठोड व पर्यवेक्षक गोपाल खाडे यांच्या मार्गदर्शनात काव्य मैफिली सहभाग नोंदवला. अतिशय उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल या दोघींचाही कवी संमेलनाचे अध्यक्ष तुळशीराम मापारी यांनी सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. आरुषीने 'माझा कास्तकार बाप' व जानवी देशमुख यांनी 'स्वप्न' ही कविता सादर केली.



यावर्षी बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव येथील माळीभवनात एकदिवसीय साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.या साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष विजय पाटील, उद्घाटक मधुराणी बनसोड,स्वागताध्यक्ष समरसिंग सोळंके,अशोकराव हटकर,तेजेंद्रसिंग चव्हाण,डॉ सदानंद धनोकर,नरेंद्रभाऊ इंगळे,सदाशिव शेळके,तुळशीराम बोबडे,तुळशीराम मापारी,ऍड.भाऊराव भालेराव धोंडीराम खंडारे हे विचारपीठावर उपस्थित होते. यावेळी सत्कार सोहळा व कथाकथनाचा कार्यक्रमात विजय पाटील इंगळे नरेंद्र इंगळे व नयना देशमुख यांनी कथा सादर केल्या. यावेळी कुशल राऊत यांच्या घरट्यात विसावलेल्या कविता या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले

सूत्रसंचलन चंद्रशेखर महाजन व देवबाबू लुले यांनी तर आभार डॉ.लक्ष्मण उगले यांनी मानले. एडमिन पॅनलचे लक्ष्मण दारमोडे, डॉ.लक्ष्मण उगले, राजेश गिऱ्हे व कुशल राऊत यांनी त्या दोघींचे विशेष कौतुक केले.त्या दोघी आपल्या यशाचे श्रेय तरुण संपादक मंडळाचे गोपाल खाडे,नीता तोडकर,दिपाली खोडके व वर्गशिक्षक विकास रुईकर तसेच रुपाली लोखंडे यांना देतात. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता वऱ्हाडी कट्ट्याच्या सर्व सदस्यांनी अथक मेहनत घेतली

# एकांबा गावात घाणीचे साम्राज्य ; दलित वस्तीतील नागरिकांचे आरोग्य धोक्यात !

### वेळोवेळी सांगून देखील..! ग्रामपंचायत अधिकारी आणि ग्राम पंचायत प्रशासनाचे चे दुर्लक्ष"

वाशीम(प्रतिनिधी)दि. 29, तालुक्यातील एकांबा गावातील वार्ड ३ मध्ये मागील अनेक महिन्यापासून गटारगंगा साचली आहे. या गटारगंगेमुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.गावातील सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी ग्रामसेवक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. एकांबा गावातील दलितवस्ती वार्ड क्र.३ मधील गटारगंगा त्वरीत बंद करुन गावातील सांडपाण्याची वरिष्ठांनी कायमस्वरूपी योजना करून या परिसरातील नागरिकांना न्याय द्यावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.वाशीम तालुक्यातील एकांबा गावामध्ये ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणून तेथील ग्रामसेवक यांचेकडे सर्व अधिकार आहेत,गावातील वार्ड



३ मध्ये गावातील सांडपाणी साचल्यामुळे या भागात गटारगंगा निर्माण झाली आहे. यामुळे दलित वस्तीतील स्थानिक नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असून काही दिवसापूर्वीच एक लहान मुलाचा आजाराने ग्रासून मृत्यू देखील झाल्याची घटना घडली आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने यावरती तातडीने या गटारगंगेचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी नागरिकांनी अनेकवेळा ग्रामसेवकाला प्रत्यक्ष भेटून सांगितले मागणी देखील केली. परंतु संबंधित ग्रामसेवकाने अद्यापपर्यंत या गंभीरबाबीची दखल घेतली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. वार्ड ३ मध्ये बहुतांश दलीत नागरिक राहतात. केंद्रशासन व राज्यशासन ग्राम विकासाच्या,आरोग्याच्या,स्वच्छतेच्या, शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी अनेक योजना राबविते. परंतु शासनाच्या 'या' दोन्ही शासनाच्या योजना एकांबा गावात आजपर्यंत पोहोचल्यात नाहीत का ? माजी पदाधिकारी व ग्रामसेवकाने कागदोपत्री विकास दाखवून स्वतःचा विकास केला ? असा सवालही नागरिकांकडून केल्या जात आहे. एकांबा गावातील वार्ड ३ मधील गटारगंगा कायमस्वरुपी बंद करण्यासाठी जि.प. चे सिईओ, पंचायत समितीचे बीडीओ यांनीच पुढाकार घेऊन संबंधित अधिकाऱ्याला आदेश द्यावे अथवा बदली करून गावातील नागरिकांना न्याय द्यावा अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

# अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र राज्य सदस्य पदी बाळासाहेब जरांडे यांची नियुक्ती करण्यात आली

**प्रतिनिधी शाम जगताप**

अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्षपदी राहुल जयसिंग भोंडे, महाराष्ट्र राज्य सदस्य बाळासाहेब जरांडे, पुरंदर तालुका महिला उपाध्यक्ष सौ सोनाली दोडके, जेजुरी शहर उपाध्यक्ष अनिल भोंडे, महिला सचिव सौ कविता भोंडे,यांची नियुक्ती

अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र राज्याच्या प्रदेश अध्यक्षपदी राहुल जयसिंग भोंडे यांची नियुक्ती करण्यात आली. या वेळी त्यांना नियुक्तीपत्र संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब भांडवलकर व महाराष्ट्र राज्य प्रसिद्धी प्रमुख दत्ता नाना भोंगळे यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आले.

या प्रसंगी उपस्थित सर्व मान्यवरांनी राहुल भोंडे यांच्या निवडीचे स्वागत करत त्यांच्या पुढील सामाजिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या वेळी संस्थापक सचिव अतुल पवार, सल्लागार मंगेश गायकवाड, खजिनदार इजाज पानसरे, महाराष्ट्र राज्य मार्गदर्शन दिलीप बापू गुरव, पुणे जिल्हा युवक अध्यक्ष



समीर मुलाणी, महिला प्रदेशाध्यक्षा सुजाता गुरव, पुणे जिल्हा महिला अध्यक्षा सौ. राणी भंडलकर, जेजुरी शहर अध्यक्ष सचिन कुंभार, पुरंदर तालुका महिला अध्यक्षा सौ. मयुरी ताई जरांडे, जेजुरी शहर महिला अध्यक्षा सौ. योगिता ताई मोरे, जेजुरी शहर उपाध्यक्षा दिपाली ताई कुंभार, सासवड शहर अध्यक्ष सचिन वढणे, उपाध्यक्ष समीर बागवान, कार्याध्यक्ष महेश दिवेकर,सुमित दादा पवार ,सौ रोहिणी खुडे, सौ पूजा दोडके, सौ सपना दोडके, सौ वर्षा साळवे, सौ मीरा सकट, सौ पल्लवी दोडके, सौ रेशमा दोडके,तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

या नियुक्तीमुळे संस्थेच्या कार्याला नवी दिशा मिळेल असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.